## एपीएमसी पोलीस ठाणे, नवी मुंबई

### कोविड -१९ महामारीमध्ये कोरोणा आजारावरील रेमडेसिव्हीर इंजेक्शन काळ्या बाजाराने विक्री करत असणारे महीलेस केले गजाआड

-----------------------------------------

गुन्हयाची थोडक्यात हकीकत - ता.म.वेळी व जागी दिनांक २३/०४/२०२१ रोजी २२:३५ वाजताचे सुमारास महिला आरोपीत हिने कोवीड १९ या साथीच्या आजाराचे औषध म्हणुन वापरात येणारे रेमडेसिवीर इंजेक्शनचे दोन नग हे बेकायदेशिररित्या, अवैध मार्गाने मिळवुन स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता कोणताही परवाना नसतांना छापील किंमतीपेक्षा अधिक दराने तसेच डॉक्टरचे प्रिस्क्रीप्शन व कोवीड तपासणी अहवालाशिवाय अधिक किंमतीने बेकायदेशीररित्या पामबीच रोड, वंडरवुड फर्निचर मॉल समोर फुटपाथवर, एपीएमसी सेक्टर २६, वाशी, नवी मुंबई येथे आपले कब्जात बाळगुन विक्री करीत असतांना मिळुन आली म्हणुन फिर्यादी यांनी त्यांच्या विरूध्द भादवि कलम ४२० सह कलम औषधी किंमत नियंत्रण आदेश २०१३ परिच्छेद २६ सह जिवनावश्यक वस्तुंचे अधि.१९५५ चे वाचन कलम ३, २ (सी), दंडनीय कलम ७(१)(ए)(II) सह औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियमामधील कलम १८ (सी) चे दंडनीय २७(बी)(II) या कलमाचे उल्लंघन केल्याने फिर्यादी यांनी सरकार तर्फे फिर्याद दिली म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सध्या कोविड-१९ हा रोग असलेल्या रूग्नांना रेमडीसिवीर इंजेक्शन काळ्याबाजारात विक्री होत असल्याबाबत वर्तमान पत्रात, सोशल मिडीयावर बातम्या प्रसिध्द होत आहे त्या अनुशंगाने मा.पो.उप.आ सुरेश मेंगडे सो. परि-१, सपोआ.विनायक वत्स यांनी वपोनि श्री.रामुगडे यांना विशेष पथक स्थापन करून कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुशंगाने पो.नि.बी.एस. सय्यद (गुन्हे) ,गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उपनि. आव्हाड व स्टाफ यांना रेडमेसिवीर इंजेक्शनबाबत माहीती काढुन कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे दि.२३/०४/२०२१ रोजी पो.उपनि आव्हाड यांना त्यांच्या गुप्त बातमीदाराकडुन खबर मिळाल्यावरून बनावाट ग्राहक तयार करून एपीएमसी पोलीस ठाणे हद्दीत पामबीच रोड, वंडरवुड फर्निचर मॉल समोर फुटपाथवर, एपीएमसी सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई येथे सापळा लावण्यात आला व महिला आरोपीत हिने कोवीड १९ या साथीच्या आजाराचे औषध म्हणुन वापरात येणारे रेमडेसिवीर इंजेक्शनचे दोन नग हे बेकायदेशिररित्या, अवैध मार्गाने मिळवुन स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता कोणताही परवाना नसतांना छापील किंमतीपेक्षा अधिक चढया दराने तसेच डॉक्टरचे प्रिस्क्रीप्शन व कोवीड तपासणी अहवालाशिवाय अधिक किंमतीने बेकायदेशीररित्या दोन रेमडेसिवीर इंजेक्शन एकुण २२ हजार रूपये किंमतीस विक्री करत असतांना ताब्यात घेवुन एफडीआय अधिकारी यांचे फिर्यादीवरून गुन्हा दाखल करून नमुद महीलेस अटक करण्यात आली आहे. तसेच तीच्याकडे अधिक कौशल्यपुर्ण तपास करून एकुण ०४ रेडमेसिवीर इंजेक्शन जप्त करण्यात आले आहे तसेच नमुद गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

नमुद कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त सो, श्री. बिपीनकुमार सिंह, मा. पोलीस सह आयुक्त सो, श्री. जय जाधव, मा. पोलीस उप आयुक्त, परि-०१ श्री सुरेश मेंगडे व मा. सहा पोलीस आयुक्त, श्री. विनायक वत्स यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विकास रामुगडे ,पो.नि.(गुन्हे) बी.एस. सय्यद, यांच्या सुचनेप्रमाणे पोउपनि शरद आव्हाड, पोलीस हवालदार/१०१० कदम, महीला पोलीस हवालदार/१८७ चव्हाण,पोना/२६७२ विशाल जगताप, पोलीस नाईक/१९५४ सुनिल पाटील, पोलीस नाईक/२३२६ संदेश म्हात्रे ,पोशि/३०७२ विलास भोर यांनी केली.

